# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन,शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.वेबसाईट: www.msbnpe.org ई-मेल- msbnpe@gmail.com ,मो. नं: ०२२ २२६११०१५

## MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of medical education and research, ४th floor, st.georges hospital campus, p.d'melo road, fort, mumbai-४०० ००१ website:www.msbnpe.org e-mail- msbnpe@gmail.com, mobile no- ०२२ २२६११०१५

क्र.मराशुवपशिमं/महाडिबीटी/शिक्षण शुल्क/२०२२-२३/ 7528 /२०२३ दिनांक- 03 /०३/२०२३

प्रति,

प्राचार्य / संस्थाप्रमुख,

सर्व संलग्नीत ए.एन.एम. व जी.एन.एम. संस्था,

महाराष्ट्र राज्य.

**विषय :** शै.व. २०२१-२२ साठी ए.एन.एम. व जी.एन.एम. अभ्यासक्रमाकरीता शुल्क नियामक प्राधिकरण यांनी मंजूर केलेल्या शिक्षण शुल्कास शै.व. २०२२-२३ करीता मंजुर करुन महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईनरीत्या विनंती सादर करणेबाबत.

**संदर्भ :** १. शुल्क नियामक प्राधिकरण, वांद्रे यांचे दि. ३० नोव्हेंबर २०२१ रोजीचे परिपत्रक.
२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.८९/२०/ शिक्षण-१, दिनांक. १३.१२.२०२२.
३. क्र.मराशुवपशिमं/शिक्षण शुल्क /२०२२-२३/६८७५/२०२३, दि. १९/०१/२०२३.
४. क्र. मराशुवपशिमं/शिक्षण शुल्क मंजूरी/२०२२-२३/७५१४/२०२३, दि. ०२/०३/२०२३.

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये मंडळाशी संलग्नीत ए.एन.एम. व जी.एन.एम. संस्थांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र. २ नुसार ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी "शिक्षण शुल्क समिती" गठीत करण्याबाबतचा शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामार्फत निर्गमित करण्यात आला आहे. शासन निर्णयामध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ साठी शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी निश्चीत केलेल्या शुल्काप्रमाणे सन २०२२-२३ साठी शुल्क संरचना असावी व सन २०२२-२३ साठी नव्याने मान्यता दिलेल्या ए.एन.एम., जी.एन.एम., व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांची शुल्क निश्चिती नवनियुक्त समितीद्वारे करण्याबाबतचे नमुद करण्यात आले आहे.

त्यानुसार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या समितीच्या बैठकीमध्ये मंजुर झालेल्या ठरावानुसार शुल्क नियामक प्राधिकरण यांनी संदर्भ क्र. १ नुसार शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२, ए.एन.एम., जी.एन.एम. अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांकरीता मंजुर केलेले शुल्क शैक्षणिक वर्ष सन २०२२-२३ साठी नव्याने मंडळामार्फत संलग्नता देण्यात आलेल्या संस्थांना Adhoc शुल्कास मान्यता देण्यात आलेली आहे.

**१. मंडळाशी संलग्नीत असलेल्या पूर्वीच्या संस्थाकरीता खालील बाबी बंधनकारक राहतील :**

अ) महाडीबीटी पोर्टलवर ऑललाईनरीत्या विनंती सादर करतेवेळी कागदपत्रांमध्ये शुल्क नियामक प्राधिकरण यांनी शै.व. २०२१-२२ करीता मंजूर केलेले शुल्क व शै.व. २०२१-२२ करीताचे संलग्नता पत्र अपलोड करणे.

२. शै.व. २०२२-२३ पासून मंडळाशी संलग्नीत असलेल्या संस्थाकरीता खालील बाबी बंधनकारक राहतील :

अ) महाडीबीटी पोर्टलवर ऑललाईनरीत्या विनंती सादर करतेवेळी कागदपत्रांमध्ये शासन निर्णय व संलग्नता पत्र अपलोड करणे.

ब) मंडळाकडे टपालाव्दारे / हस्तबटवड्याव्दारे शै.व. २०२२-२३ करीता शुल्क नियामक प्राधिकरण यांनी मंजूर केलेल्या Adhco शुल्कास महाडीबीटी पोर्टलवर ऑललाईनरीत्या मंजूर करण्याकरीता अर्ज व त्यासोबत शासन निर्णय व संलग्नता पत्र.

सदर माहिती व कागदपत्रे वरीलप्रमाणे अपलोड न केल्यास मंडळामार्फत विनंती नाकारण्यात येईल. सदर बाबींकरीता सर्वस्वी संस्थेची जबाबदारी राहील, याची नोंद घ्यावी.

संचालक

महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ